# अपठित गद्य उतारे

## स्वाध्याय

**खालील उतारे वाचून त्याआधारे सूचनेनुसार कृती करा.**


## उतारा १

चिंचपोकळीला आल्यानंतर मास्तरांचा दुसरा काव्यसंग्रह 'माझे विद्यापीठ' प्रसिद्ध झाला. हा काव्यसंग्रह नंतर अनेक विद्यापीठांतून अभ्यासक्रमालाही लावला होता. त्यासाठी अनेक कॉलेजांमधून मास्तरांना मुलाखतीसाठी, काव्यवाचनासाठी बोलावलं जायचं. मला गंमत वाटायची आणि कौतुकही. कारण मास्तर स्वत: कधीच कॉलेजची पायरी चढले नव्हते, पण त्यांची कविता तेरावी, चौदावीची मुलं अभ्यासत होती. अनेकांची पत्रंही यायची मास्तरांना. मास्तर खूप आनंदात असायचे. एखादी नवी कविता लिहून झाली की मग विचारायलाच नको. त्यांच्या अनेक कवितांची पहिली श्रोता मीच असायची. कविता लिहून झाली की ते मला वाचून दाखवायचे. त्यांनी कविता लिहिल्याचा मलाही आनंद होत असे, पण तो व्यक्त कसा करायचा हे मला समजत नसे किंवा कविता ऐकल्यावर प्रतिक्रिया काय द्यायची हेही समजत नसे. अनेकदा मी माझ्या संसाराच्या, पोराटोरांच्या विवंचनेत असल्यामुळे आणि उद्याच्या विचारात असल्यामुळे मास्तरांच्या कवितेचे शब्द माझ्या कानांवर पडायचे, पण त्यातला भाव मात्र मला समजायचाच नाही.

(कृष्णाबाई सुर्वे)

## वरील उताऱ्याच्या आधारे पुढे दिलेल्या कृती करा.


**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. अनेक विद्यापीठांतून अभ्यासक्रमाला होता.

२. कॉलेजांमधून मास्तरांना मुलाखतीसाठी, काव्यवाचनासाठी निमंत्रण.


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. संसाराच्या २. पोराटोरांच्या

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१.




२.




**उत्तर:** १. माझे विद्यापीठ

२. लेखिकेला कविता वाचून दाखवत.

**कृ.४. माझे मत :**

**जिच्याजवळ तुम्ही आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करू शकता अशी तुमच्या आयुष्यातील व्यक्ती कोण आहे?**

उत्तर: माझ्या मोठ्या भावाकडे मी माझ्या सर्व भावना मोकळेपणाने व्यक्त करू शकतो. तो माझ्यापेक्षा तीनच वर्षांनी मोठा आहे. तसेच आम्ही एकाच शाळेचे असल्याने लहानपणापासूनच त्याचे माझ्यावर विशेष लक्ष असायचे. आम्ही एकत्रच शाळेत जायचो. समवयस्क असल्यामुळे तो मला अत्यंत जवळचा वाटतो. काहीही आनंदाची गोष्ट घडली की आई बाबांच्याही आधी मी त्याला सांगतो, एखादी चूक कळत-नकळतपणे घडल्यास मी त्याच्याकडे कबूल करतो. कधी तो माझी कडक शब्दांत कानउघडणी करतो, तर कधी प्रेमाने समजावतो. अभ्यासातल्या अडचणी सोडविण्यासाठी सगळ्यांत पहिली व्यक्ती म्हणजे माझा दादाच. खूप अभ्यास करून मोठं होण्याचा प्रांजळ सल्ला तो मला नेहमीच देत असतो.

या सर्व गुणांमुळेच तो मला अत्यंत जवळचा व प्रिय वाटतो.

## उतारा २

दोन विद्वान माणसांची गोष्ट सांगतात. त्यांतला एकजण एकदा दुसऱ्याच्या भेटीला गेला. भेट झाली. त्यानंतर दोघेही आपापल्या जागी खुर्च्यांवर शांतपणे बसून राहिले. एकमेकांशी अवाक्षरही बोलले नाहीत.

तासाभराने भेटीला आलेला विद्वान उठला . आणि यजमानांचा निरोप घेताना हर्षभरित होऊन म्हणाला,

"वा वा ! किती मजेत वेळ गेला म्हणून सांगू !"

यजमान म्हणाले,

"माझाही वेळ फार छान गेला !"

एक तासभर शब्दही न बोलता संवादाचा आनंद मनसोक्त लुटणारे हे दोन विद्वान म्हणजे 'संवाद' या संकल्पनेची परमोच्च आदर्शावस्था म्हटली पाहिजे. दोन जिवलग, अध्यात्मक्षेत्रातील गुरुशिष्य, एकाच ध्येयाचा किंवा कलेचा ध्यास घेतलेले उत्कट साधक हे असे 'शब्देविण संवादिजे' या अवस्थेप्रत जाऊ शकतात.

(शांता शेळके)

**वरील उताऱ्याच्या आधारे पुढे दिलेल्या कृती करा.**

**कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.**

**एक विद्वान दुसऱ्या विद्वानाच्या भेटीला गेला**

↓

१

↓

२

↓

३

↓

४

↓

**विद्वानाने यजमानांचा निरोप घेतला**


**उत्तर:** १. दोघांची भेट झाली.

२. दोघेही खुर्च्यांवर शांत बसून राहिले.

३. एकमेकांशी अवाक्षर बोलले नाहीत.

४. तासाभराने भेटीला आलेला विद्वान उठला.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. दोन जिवलग.

२. अध्यात्म क्षेत्रातील गुरुशिष्य.

३. एकाच ध्येयाचा व कलेचा ध्यास घेतलेले उत्कट साधक.

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**




**उत्तर:** एक तासभर शब्दही न बोलता संवादाचा आनंद मनसोक्त लुटणारे विद्वान

**कृ.४. माझे मत :**

**आपल्या आजूबाजूच्या लोकांशी संवाद साधण्यासाठी तुम्ही कोणती साधने किंवा माध्यमे वापरता?**

**उत्तर:** संवाद हा दोन व्यक्तींना एकमेकांशी जोडणारा दुवा असतो. हा संवाद साधण्यासाठी मी प्रत्यक्ष बोलणे, स्मार्टफोन, ई-मेल, लघुसंदेश इत्यादी साधनांचा वापर करतो. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे या साधनांनी संवाद अतिशय जलद व सोपा झाला आहे. असे असले; तरी प्रत्यक्ष बोलून संवाद साधणे मला जास्त आवडते. यामुळे कोणतेही गैरसमज होत नाहीत आणि आपल्याला जे सांगायचे आहे ते आपण व्यवस्थित पोहोचवू शकतो. आपल्या चेहऱ्यावरील भाव समोरच्याला दिसत असल्यामुळे तोही आपले बोलणे अधिक सहजतेने समजू शकतो. विशेषत: आईवडिलांशी किंवा इतर जवळच्या व्यक्तींशी प्रत्यक्ष संवाद अतिशय सोयीस्कर असतो. यामुळे गैरसमजांना थारा तर उरत नाहीच आणि जवळच्या व्यक्तींशी असलेले बंध अधिक दृढ होतात.


## उतारा ३

हवामानातला बदल जाणवायला लागला आहे. थंडी निरोप घेता घेता उत्तररात्रीपुरती सोबत करते आहे आणि दिवसा उन्हाळ्याची ललकारी देणारी उन्हाची तीव्रता चटके देऊ लागली आहे. एकीकडे पतझड सुरू आहे. अंगण, रस्ते पिवळ्याधम्मक पण वाळक्या पानांनी भरून जाताहेत. दुसरीकडे अशोकाची, वरूणाची, शिरिषाची अशी कितीक झाडं तेजस्वी पालवीनं झगमगून उठताहेत. आंब्याचा मोहोर, कोकिळाच्या लकेरी, उसाची गुऱ्हाळं, कलिंगडाचे ढीग, द्राक्षांचे घोस – ही सगळीच वसंत ऋतूच्या स्वागताची चाहूल, खरोखरीच मला मोहरून टाकते आहे. वारासुद्धा बदलल्यासारखा वाटतो आहे. निसर्गानं घेतलेलं हे वळण आहे. या ऋतुबदलाला साजेसे काही सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम याच दिवसांत साजरे होतात. माझं मन या ऋतूमधल्या नव्या वळणाबरोबर धुमारल्यासारखं चैतन्यमय झालं आहे. पण या चैतन्याला नकोसे धार्मिक, सांस्कृतिक रंग चढवले जाताहेत या जाणिवेनं मी अस्वस्थ होते आहे.

(विद्या बाळ)


वरील उताऱ्याच्या आधारे पुढे दिलेल्या कृती करा.

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. अंगण २. रस्ते

कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. अशोक २. वरूण
३. शिरीष

कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. आंब्याला मोहोर येतो.

२. कोकिळाची लकेर ऐकू येते.
३. उसाची गुऱ्हाळं दिसू लागतात.
४. द्राक्षांचे घोस दिसू लागतात.
५. कलिंगडाचे ढीग दिसू लागतात.

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **ऋतूमधल्या नव्या वळणाबरोबर लेखिकेचे मन असं झालं आहे** | → | |
| २. | **लेखिका या जाणिवेने अस्वस्थ होते आहे** | → | |

**उत्तर:** १. धुमारल्यासारखं चैतन्यमय
२. चैतन्याला नकोसे धार्मिक, सांस्कृतिक रंग चढवले जात आहेत.

**कृ.५. माझे मत :**

**निसर्गातील वेगवेगळ्या चमत्कारांनी तुम्ही कधी मोहित झाला आहात का?**

**उत्तर:** हो ! निसर्ग एक जादूगार आहे आणि आपल्या जादूच्या साहाय्याने वेगवेगळे चमत्कार दाखवून तो आपल्याला आश्चर्यचकितही करत असतो. कळीचे फुलात होणारे रूपांतर, अळीचे फुलपाखरू होणे, बी चे रोपटे तयार होणे ह्या साध्या गोष्टींतूनही निसर्गाची किमया दिसून येते. आकाशात दिसणारे इंद्रधनुष्यही सात रंगांची उधळण करून साऱ्या आसमंताला सुंदर बनवते. बदलणाऱ्या ऋतूमुळे वातावरणात होणारे बदल थक्क करणारे असतात. निसर्गाचे हे सारे विभ्रम मला नेहमीच मोहित करतात. मन उदास असेल; तर निसर्गाच्या सोबतीने मनाची उदासीनता सहज दूर होते.


## उतारा ४

पन्हाळ्याचा दरगाह म्हणजे हिंदू-मुस्लीम लोकांच्या एकतेचे प्रयत्न केलेल्या वलींचे (संत पुरुषाचे) पवित्र स्थान आहे. या दरगाहला मुस्लिमांच्या इतकेच किंबहुना जास्तच हिंदू भक्त आहेत. सगळ्या पंचक्रोशीतून सर्व जाती धर्मांचे लोक नारळ, मलिदा, पेढे, खडीसाखर, उदबत्ती घेऊन सजून-धजून स्त्रिया, मुलाबाळांसह दर्शनाला येतात. प्रचंड गर्दी असते. नारळाचा ढीग पडतो, मलिदा, पेढे घेता घेता आणि अंगारा देता देता मुजावर घामाघुम होतात. मुस्लिमांच्या मन्नतबरोबर हिंदूंच्या नवसाच्या तोरणांनी दरगाहचा छत भरून जातो. धुपाचा सुगंधी धूर, चंदनाचा वास, उदबत्ती आणि निशिगंधाचा दरवळ- एक वेगळंच वातावरण असतं. मोठ्या बांधीव ओवऱ्या मला खूप आवडत असत. उरुसातील खेळणी, पाळणे, मिठाईची दुकाने, आरास, नवीन कपडे, जरीच्या रिबीनी, मेळे, पन्हाळ्याची लाल-लाल माती, हिरवीगार हिरवाई, गार-गार हवा- जीव वेडा होऊन जात असे.

(आशा आपराद)

वरील उताऱ्याच्या आधारे पुढे दिलेल्या कृती करा.

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. नारळ    २. मलिदा

३. पेढे    ४. खडीसाखर

५. उदबत्ती


कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. मलिदा, पेढे घेता घेता

२. अंगारा देता देता


कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. धुपांचा सुगंधी धूर  २. चंदनाचा वास

३. उदबत्तीचा सुगंध  ४. निशिगंधाचा दरवळ

कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.



**उत्तर:** १. उरुसातील खेळणी २. पाळणे
३. मिठाईची दुकाने ४. आरास
५. नवीन कपडे ६. जरीच्या रिबिनी
७. मेळे
८. पन्हाळ्याची लाल माती
९. हिरवीगार हिरवाई
१०. गार हवा

**कृ.५. चौकट पूर्ण करा.**

१. **पन्हाळ्याचा दरगाह म्हणजे यांचे पवित्रस्थान आहे** → [ ]

२. **मुस्लिमांच्या मन्नतबरोबर या गोष्टींनी दरगाहचा छत भरून जातो** → [ ]

**उत्तर:** १. हिंदू-मुस्लीम लोकांच्या एकतेचे प्रयत्न केलेल्या वलींचे
२. हिंदूंच्या नवसाच्या तोरणांनी

**कृ.६. माझे मत :**

**तुम्ही पाहिलेल्या जत्रेचे वर्णन करा.**

**उत्तर:** बालपणीच्या आठवणींच्या ठेव्यात प्रत्येकाने एखादी तरी जत्रा किंवा उरूस पाहिल्याची आठवण

असतेच. मुंबईतील माहीम मोहल्ला येथे वर्षानुवर्षे जानेवारी महिन्याशेवटी इस्लाम धर्मातील पवित्र संत 'मगदूम बाबा' यांच्या नावे दहा दिवस उरूस चालत असे.

पांढरीशुभ्र मशीद मोगरा, जाई, जुई, गुलाब अशा फुलांच्या माळांनी सजविली जायची. पवित्र संत मगदूम बाबा यांच्या तुरबतीवर फुलांच्या चादरी चढविल्या जात असत. सकाळ-संध्याकाळ नमाज पढला जात असे. केवळ मुस्लीमच नाही; तर सर्वधर्मीय या मशिदीस उरुसाच्या दिवसांत भेट देत असत. येथे चादर चढविणाऱ्यांवर मोरपीस फिरवून आशीर्वाद दिला जाई. गर्दीने फुललेल्या या उरुसात खाण्यापिण्याचीही चंगळ असे. शुद्ध तुपात बनलेल्या व भरपूर सुकामेवा घातलेल्या विविध प्रकारच्या मिठाया तसेच विविध शाकाहारी, मांसाहारी, तंदूरचे चविष्ट पदार्थ यांची रेलचेल असे. खेळण्यांची, चपलांची दुकाने, विविध खेळ, रंगीबेरंगी बांगड्या, कानातले इ. दुकानांनी उरुसाची शान वाढत असे.

उरूस म्हणजे इस्लाम धर्माचे एक श्रद्धास्थानच असते. तसेच सर्वधर्मियांना एकत्र आणून आनंद साजरा करण्याचेही ते एक महत्त्वाचे माध्यम आहे यात शंकाच नाही.

## सरावासाठी काही उतारे

१. **खालील उतारा वाचून त्याआधारे सूचनेनुसार कृती करा.**

आनंदवनाचा भौगोलिक पत्ता सांगायचा झाला तर महाराष्ट्रातील नागपूरजवळच्या चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा या तालुक्याच्या गावापासून सुमारे ५ कि.मी. अंतरावर आनंदवनाचा हा ४६५ एकर भूमीचा परिसर आहे.


इथं वेदनांची सहवेदना झाली, दु:खाची सह-अनुभूती झाली, भीतीची शांती झाली आणि वनातील आनंद-आनंदाचं वन निर्माण झालं!

बाबा आमटे या पाच अक्षरांमधील पंचप्राणांच्या सामर्थ्यानं पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या सर्वांपर्यंत या सर्वांच्या मदतीनं त्यांनी पोहोचवला, तो फक्त आनंद!!


ऋषींच कूळ आणि नदीचं मूळ शोधू नये असं म्हणतात म्हणून केवळ बाबांना ऋषी म्हणता येणार नाही का? त्यांचं मूळ, त्यांचं कूळ, त्यांचं जन्मगाव, त्यांचे मातापिता, त्यांचं घराणं, त्यांचं शिक्षण, त्यांच्या अनुभूती, त्यांचा त्याग, त्यांचं मन म्हणज़े त्यांचं कार्य.

(चित्रलेखा पुरंदरे)


कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.




कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.




कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.



कृ.४. चौकट पूर्ण करा.

१. आनंदवन येथे आहे → [ ]

२. आनंदवनाचा परिसर एवढ्या एकरचा आहे → [ ]

कृ.५. माझे मत :

**बाबा आमटेंप्रमाणेच समाजातील उपेक्षितांच्या कल्याणासाठी स्वत:चे आयुष्य समर्पित करणाऱ्या एखाद्या व्यक्तीविषयी लिहा.**

२. **खालील उतारा वाचून त्याआधारे सूचनेनुसार कृती करा.**


मी परवा एक मुक्त तुरुंग पाहिला. सारे गुन्हेगारच. परंतु स्वत:च्या शेतीवर मुक्तपणानं जीवन जगतात. त्यांच्यावर फक्त लक्ष ठेवलं जातं. परंतु ते साखळदंडांनी बंदिस्त नाहीत. त्यांच्या अवतीभवतीचे गज काढून घेतलेत. त्यांना मुक्तपणे उडायला सांगितलं. आणि गंमत आहे, त्यांच्यापैकी कुणीही पळून गेलेला

नाही! स्वातंत्र्य ते हेच. जेव्हा माणसं परिपूर्णरीत्या मुक्त होतात, तेव्हाच ती अधिक जबाबदार, अधिक संयमी आणि कर्तव्यनिष्ठ होतात.


एक मनुष्य अखंड जेवतो आणि दुसरा सतत उपाशी राहतो हे निसर्गाला कधीच मंजूर नाही. एक मनुष्य दुसऱ्याचा मालक होऊ शकतो, हे निसर्गाला कधीच मंजूर नाही. प्रत्येक जण स्वयंभू आहे. त्याचं अस्तित्व कुणाच्या दयेवर उभं नाही. एखादं उंच वडाचं झाड केवळ आकारानं, सामर्थ्यानं मोठं आहे, म्हणून त्याचं मोल जुईच्या फुलापेक्षा जास्त आहे असं नाही.

(बी. जी. वाघ)


**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**



कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.




कृ.४. माझे मत :

स्वातंत्र्याचे महत्त्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

३. खालील उतारा वाचून त्याआधारे सूचनेनुसार कृती करा.

पावसाच्या थेंबांचा हा आवाज सोडला तर रात्रीच्या वेळी सारंच शांत आहे. हिमशिखरावर रेंगाळणारे ढग आता खाली उतरले आहेत. त्यात दूरवरचा किन्नोर कैलास, बलदंड देहाचा रारंग ढांग आणि विळखा घालून वाहणारी सतलज, सगळंच दिसेनासं झालं आहे. टेबलावरचा कंदील, समोरचे कागद आणि हातातलं पेन एवढ्याच गोष्टींचं अस्तित्व उरल्यासारखं वाटतं आहे.

हा खराखुरा एकांतवास. पण एकांतवासातही माणूस एकटा थोडाच असतो? माझ्या नाही तुमच्याशी गप्पा चाललेल्या?

तुम्ही विचारलंत, हिमालय कसा दिसतो? केवढा अवघड प्रश्न! हिमालयाचं मला झालेलं पहिलं दर्शन केवळ अविस्मरणीय. सिमल्याहून पुढं, नारकंड्याला हिमालयाची शुभ्रधवल हिमशिखरं एकदम दिसू लागली. एकाच्या पाठोपाठ दुसरं, तिसरं... नजर पाहू शकेल एवढी शिखरंच शिखरं!

(प्रभाकर पेंढारकर)

**कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.**



कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.

(२)
↑
(१) ← एकांतात न दिसणाऱ्या गोष्टी → (३)

कृ.३. चौकट पूर्ण करा.

१. | याचे पहिले दर्शन लेखकाला अविस्मरणीय वाटले | → | |

२. | हिमालयाची शुभ्रधवल हिमशिखरे लेखकाला येथे दिसू लागली | → | |

कृ.४. माझे मत :

तुमच्या शहराच्या आसपास असलेल्या निसर्गरम्य ठिकाणाचे वर्णन करा.

४. खालील उतारा वाचून त्याआधारे सूचनेनुसार कृती करा.


आमच्या गल्लीत आमचं एकच मुसलमानाचं घर. गल्लीतल्यांनी कधी एकही सण चुकवला नाही. प्रत्येक सणाचा जो स्वयंपाक घरात केला असेल तो ताटात भरून आमच्या घरात हे ताट येत असे. पोळी, आमटी, भाजी-भाकरी, धपाटे, वाटाण्याची उसळ,

बाजरीचे हुंडे, दिवाळीचा फराळ प्रत्येक घरातून हे पदार्थ येत, त्यामुळं घरात सण केल्यापेक्षाही जास्त पदार्थ जमत.


आमच्या घरात मुस्लीम म्हणून दोन ईद साजऱ्या केल्या जात. एक रमजान व दुसरी बकरी ईद. यावेळी मा खसखस, सुका मेवा, पेढे, गूळ, साखर, दूध, शेवयापासून तयार केलेला शिरखुर्मा आठ-दहा घागरीच्या मोठ्या पातेल्यात करायची. सुकं मटण, रस्सा, पुलाव असा स्वयंपाकाचा बेत असे. भई गल्लीत प्रत्येकाच्या घरी जाऊन आमंत्रण देत. मा सर्वांना अगत्यपूर्वक आग्रहानं वाढायची. माझ्या सगळ्या मैत्रिणी ईद दिवशी जेवायला, नंतर शिरखुर्मा संपेपर्यंत तो प्यायला दोन-तीन दिवस येत असत.

(आशा आपराद)


**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.




कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.




कृ.४. ओघतक्ता पूर्ण करा.



कृ.५. चौकट पूर्ण करा.

१. गल्लीतल्यांनी हे चुकवले नाही → [ ]

२. मा शिरखुर्मा याच्यामध्ये करायची → [ ]

कृ.६. माझे मत:

तुमच्या घरात साजऱ्या होणाऱ्या कोणत्याही सणाचं वर्णन करा.